# मुलांसाठी बाइबल
प्रस्तुत



# न झुकणारे पुरुष

लेखक: Edward Hughes
रेखाचित्रकार: Jonathan Hay
अनुवादक: Rev. Shilas Gavit
रूपान्तरकार: Mary-Anne S.

60 गोष्टींतील 33 (पहिली)

**www.M1914.org**

***Bible for Children,*** *PO Box 3, Winnipeg, MB R3C 2G1 Canada*

परवाना (लाइसेंस): तुम्ही जोपर्यंत ही गोष्टविकत नाहीत, तोपर्यंत तुम्ही ती कॉपी किंवा मुद्रित करू शकता.

मराठी

Marathi

नबुखद्नेस्सर राजाने सोन्याची एक विशाल मुर्ति बनविली. डोक्यापासून तर पायापर्यंत ती मुर्ती सोन्याची होती. त्याचे सोनेरी राज्य कायमचे राहणार नाही हे सांगणारे स्वप्न देवाने त्याला दाखवले होते ते राजा कदाचित विसला असावा. जर पुर्णपणे सोन्याची असलेली मुर्ति बनवली, तर स्वप्नात आलेले देवाचे वचन खरे ठरणार नाही असे कदाचित त्याला वाटले असावे.



1

मग राजाच्या एका सेवकाने सर्व लोकांसाठी राजाचा हुकूम वाचून दाखवला, "... सुवर्णमूर्तिच्या पुढे तुम्ही साष्टांग दंडवत घालावे. जो कोणी तिला सांष्टांग दंडवत घालणार नाही त्याला तत्क्षणीच धगधगीत अग्नीच्या भट्टीत टाकण्यात येईल."



2

तिन जणांव्यतिरिक्त – राजाच्या हुकूमाप्रमाणे प्रत्येकाने केले. हि माणसे इब्री होती. ते दानिएलचे मित्र शेद्रक, मेशख, आणि अबेद्नगो होते.



3

यावेळी दानिएल तेथे नव्हता असे दिसते, परंतू मनुष्याने बनविलेल्या मुर्ति समोर दानिएलाने देखिल सांष्टांग दंडवत घालण्यास नकार दिला असता हे निश्चित.



4

दानिएल आणि त्याचे तिन मित्र राजाचे आवडते होते म्हणून राजाचे इतर ज्ञानी लोक त्यांचा हेवा करत. म्हणून ते राजाकडे जाऊन म्हणाले, "आपण बाबेल परगण्यावर नेमिलेले शेद्रक, मेशख, अबेद्नगो या तिन पुरुषांनी, महाराज, आपला हुकूम पाळला नाही. ते आपल्या देवाची उपासना करीत नाहीत आणि आपण स्थापिलेल्या सुवर्णमूर्तीची पूजा करीत नाहीत."



5



हे ऐकून नबुखद्नेस्सर राजा क्रोधाने संतप्त झाला. "जर तुम्ही साष्टांग दंडवत घातले नाही, तर तुम्हांला धगधगीत अग्नीच्या भट्टीत ताबडतोब टाकण्यात येईल. आणि माझ्या हातांतून तुम्हांस सोडवील असा कोणता देव आहे?" याप्रमाणे राजाने त्यांना इशारा दिला.

6

राजा फार मोठी चूक करत होता. तो जिवंत देवाला खरोखर आव्हान देत होता. एका मुर्तिची पुजा करुन तिच्यासमोर दंडवत घालणे हे देवाच्या नियमाविरुध्द् आहे हे ते इब्री तरुण जाणून होते. ते दंडवत न घालता तसेच उभे राहिले. त्यांना राजाची भिती वाटत नव्हती कारण ते परमेश्वरावर भरोसा करित होते.



7

राजाला उत्तर देण्यासाठी या तीन धाडसी पुरुषांकडे उत्तर होते. ते म्हणाले, "ज्या देवाची आम्ही उपासना करितो तो आम्हांस धगधगीत अग्नीच्या भट्टीतून सोडवावयास समर्थ आहे.



8


महाराज, तो आम्हांस आपल्या हातांतून सोडवील. ते कसेहि असो, पण महाराज, हे आपण पक्के समजा की आम्ही आपल्या दैवतांची उपासना करणार नाही आणि आपण स्थापिलेल्या सुवर्णमूर्तीला दंडवत घालणार नाही."
9
हे ऐकून नबुखद्नेस्सर राजा संतापला ! भट्टी जितकी तप्त होती तिच्यापेक्षा सात पटीने भट्टी अधिक तप्त करण्यास राजाने आज्ञा दिली. तरी देखिल ते पुरुष दंडवत घालणार नव्हते.
10
मग त्याने आपल्या सैन्यांतील काही बलिष्ट पुरुषांस आज्ञा केली की शेद्रक, मेशख, व अबेद्नगो यांच्या मुसक्या बांधून त्यांस त्या तप्त अग्नीच्या भट्टीत टाकावे.
11
ती भट्टी इतकी तप्त होती की ज्या पुरुषांनी शद्रक, मेशख, व अबेद्नगो यांस तिजवर नेले ते ज्वालांनी भाजून मेले.
12
राजा, लांब अंतरावरुन हे पाहात होता. धगधगीत अग्नीत तिन पुरुषांना टाकले हे राजाने पाहिले. परंतू त्याने पाहिले ते हे ऐवढेच नव्हते.
13
नबुखद्नेस्सर राजा आश्चर्यचकित झाला ! तो त्याची मदत करणाऱ्यांना म्हणाला, "आपण अग्नीत तिघां जणांस बांधून टाकिले ना?" त्यांनी राजास उत्तर दिले, "होय सरकार, हे खरे आहे."
14

राजा म्हणाला, "पाहा ! चार इसम
अग्नींत मोकळे फिरत आहेत असे
मला दिसते; त्यांस कांहीएक
इजा पोहचली नाही;
चौथ्याचे स्वरुप
तर एखाद्या
देवपुत्रासारखे
आहे."



15

मग नबुखद्नेस्सर त्या धगधगीत अग्नीच्या
भट्टीच्या दाराजवळ येऊन मोठ्याने ओरडून
म्हणाला, "अहो, शेद्रक, मेशख, व अबेद्नगो,
परात्पर देवाचे सेवकहो, अग्नीतून बाहेर या."
तेंव्हा शेद्रक, मेशख, व अबेद्नगो
अग्नीतून बाहेर आले.



16

सर्वजण त्यांच्या अवतीभोवती गोळा झाले आणि त्यांनी या तिन्ही इब्री पुरुषांना
पाहिले. त्यांना इजा करण्याचे सामर्थ्य अग्नीत नाही हे त्यांनी पाहिले. त्यांचे केस
होरपळले नव्हते आणि त्यांचे कपडे देखिल जळालेले नव्हते. अग्नीचा गंधहि
त्यांस लागला नव्हता.



17

काय घडले होते ते जेंव्हा त्याला समजले, तेंव्हा नबुखद्नेस्सर राजाने एक फार
अकलेचे काम केले. त्याने प्रार्थना केली आणि म्हणाला, "ज्या देवावर शेद्रक,
मेशख, व अबेद्नगो भरोसा करतात त्यांने आपला दिव्यदूत पाठवून त्यांना
सोडविले आहे; त्याचा धन्यवाद असो."



18

न झुकणारे पुरुष

परमेश्वराची वाणी - बाइबल मधून गोष्ट

घेण्यात आली आहे

दानिएल ३

"तुझ्या वचनांच्या उलगड्याने प्रकाश प्राप्त होतो."
स्तोत्रसंहिता ११९:१३०

ईश्वराला माहित आहे की आम्ही वाईट गोष्टी केल्या आहेत,
ज्याला तो पाप म्हणतो. पापाची शिक्षा मृत्यू आहे.

ईश्वर आमच्यावर इतके प्रेम करतो की क्रॉसवर मरण्यासाठी
आणि आमची शिक्षा भोगण्यासाठी त्याने आपल्या पुत्राला
येशूला पाठविले. येशू पुन्हा जिवंत झाला आणि स्वर्गात परत
गेला! आता ईश्वर आमच्या पापांसाठी क्षमा करू शकतो.

जर तुम्ही तुमच्या पापांपासून मुक्ती मिळवू इच्छिता, तर
ईश्वराला हे सांगा: प्रिय ईश्वरा, येशू माझ्यासाठी मेला आणि
आता पुन्हा जगतो आहे यावर माझा विश्वास आहे. कृपा करून
माझ्या जीवनात ये आणि माझ्या पापांसाठी मला क्षमा कर,
जेणेकरून आता मला नवीन जीवन प्राप्त होईल आणि नंतर मी
कायम तुझ्याबरोबर राहीन. तुझे मूल होऊन तुझ्यासाठी
जगण्यास मला मदत कर. आमेन. जॉन 3:16

बाइबल वाचा आणि ईश्वराशी रोज बोला!